॥ ॐ गं गणपतेय नमः ॥

# डीड ऑफ असाईनमेंट

डीड ऑफ असाईनमेंट आज वार ..... वार दिनांक ..... माहे ..... सन २०२६ इसवी दिवशी पुणे मुक्कामी .....

**१) श्री. संदीप दत्तात्रय धोत्रे**
वयः ४२ वर्षे, व्यवसायः नोकरी
पॅनः BBJPD4081P
**२) सौ. सुशीला संदीप धोत्रे**
वयः ३२ वर्षे, व्यवसायः गृहीणी / नोकरी
पॅनः HCVPD8219L
दोघेही राहणारः मु.पो. आळंदेवाडी, तालुकाः भोर,
जिल्हा : पुणे : ४१२२०५

लिहुन घेणार

(ज्यांचा उल्लेख इथःपर लिहुन घेणार असा केला असून सदर संज्ञेत त्यांच्या पश्चात त्यांचे वालीवारस, उत्तराधिकारी, कुलमुख्त्यार, धनको इत्यादी यांचा समावेश गृहीत धरण्यात आला आहे.)

यांसी

**श्री. मुरलीधर चत्रभुज दिवाणे**
वयः ५० वर्षे, व्यवसायः नोकरी
पॅनः ATZPD2812K
राहणारः फ्लॅट नं. बी २०३, लक्ष्मी अपार्टमेंट, स. नं. १६/९/२,
सिल्वर पार्क फेज २, धनकवडी, पुणे : ४११०४३

लिहुन देणार

(ज्यांचा उल्लेख इथःपर लिहुन देणार असा केला असून सदर संज्ञेत त्यांच्या पश्चात त्यांचे वालीवारस, उत्तराधिकारी, कुलमुख्त्यार, धनको इत्यादी यांचा समावेश गृहीत धरण्यात आला आहे.)

**कारणे डीड ऑफ असाईनमेंट करतो की,**

**मिळक तीचे वर्णन :** तुकडी पुणे पोट तुकडी तालुका : हवेली, जिल्हा : पुणे सह दुय्यम निबंधक हवेली पुणे यांचे कार्यक्षेत्रातील व पुणे महानगर पालीकेच्या हददीतील गाव मौजेः आंबेगाव बु, तालुकाः हवेली, जिल्हाः पुणे, येथील स. नं. १६, हिस्सा नं. ९/२ येथील यांसी क्षेत्र ०० हे २५ आर पैकी क्षेत्र ०० हे ०२ आर (२०० चौ. मी.) असे.

येणेप्रमाणे सदरची जमीन मिळकत व त्यातील समाईक, जागा वापरण्याच्या हक्कासह व जाणे येण्याच्या वहीवाटीच्या हक्कासहित दरोबस्त. (याचा सोयीसाठी यापुढे 'सदर जमीन मिळकत' असा उल्लेख केलेला आहे याचे सविस्तर वर्णन खालील परीशिष्ठ 'अ' मध्ये उल्लेख केलेला आहे.)

सदर जमीन मिळकत ही सौ. सुमन दत्तात्रय साळवी यांचे मालकी वहीवाटीची असुन सदर ७/१२ उताऱ्यावर त्यांच्या नावाची नोंद आहे. सदर जमीन मिळकतीच्या मालक सौ. सुमन दत्तात्रय साळवी यांनी सदर जमीन मिळकत विकसीत करण्याचे उददेशाने सदर जमीन मिळकतीचा विकसन करारनामा व कुलमुखत्यारपत्र मे. सपकाळ कन्स्ट्रक्शनस तर्फे प्रोप्रायटर श्री. संतोष दत्तात्रय सपकाळ यांना लिहुन दिले व सदरचे दस्त मे सह दुय्यम निबंधक हवेली क्र. ०९ यांच्या कार्यालयात अनुक्रमे दस्त क्र. ३७८१/२०१० व ३७८२/२०१० ने दिनांक ०७/०५/२०१० रोजी नोंदविण्यात आले.

त्यानंतर सदर जमीन मिळकत विकसीत करण्यासाठी मा. उपविभागीय अधिकारी पुणे, उपविभाग पुणे यांचे कडुन गुंठेवारी/एसआर/IV/१५५/२००७, क्र. एन.ए./एस.आर/IV/१८१/२००८, पुणेः ०१, यांचे कडुन ०७/०६/२००८ ने बांधकाम मंजुरी घेतली आहे.

सदर जमीन मिळकतीवर बांधण्यात आलेल्या लक्ष्मी अपार्टमेंट बी विंग मधील दुसऱ्या मजल्यावरील फ्लॅट नं. २०३ यांसी क्षेत्र ५३५ चौ. फुट म्हणजेच ४९.७२ चौ. मी. बिल्ट अप असे. (याचा सोयीसाठी यापुढे 'सदर फ्लॅट मिळकत / सदर मिळकत' असा उल्लेख केलेला आहे याचे सविस्तर वर्णन खालील परीशिष्ठ 'ब' मध्ये उल्लेख केलेला आहे.)

सदर फ्लॅट मिळकतीचा मे. सपकाळ कन्स्ट्रक्शनस तर्फे प्रोप्रायटर श्री. संतोष दत्तात्रय सपकाळ स्वतः करीता आणि जमीन मालक व मान्यता देणार सौ. सुमन दत्तात्रय साळवी यांचे कुलमुखत्यारधारक म्हणुन दिनांक १८/१०/२०११ रोजीचा करारनामा लिहुन देणार श्री. मुरलीधर चत्रभुज दिवाणे यांना लिहुन दिला आहे व सदरचा दस्त मे सह दुय्यम निबंधक हवेली क्र. ९

यांचे कार्यालयात दस्त क्र. ८३७८/२०११ ने दिनांक १८/१०/२०११ रोजी नोंदविण्यात आला.

लिहुन देणार यांनी सदर फ्लॅट मिळक्तीचा संपुर्ण मोबदला रक्कम ही विकसक मे. सपकाळ कन्स्ट्रक्शनस तर्फे प्रोप्रायटर श्री. संतोष दत्तात्रय सपकाळ यांना दिली त्यामुळे त्यांनी लिहुन देणार यांना सदर फ्लॅट मिळक्तीची ताबा पावती / कन्फरमेश डिड / अभिस्विकृती पावती दिनांक २०/०३/२०१२ रोजी लिहुन दिली व सदरचा दस्त मे सह दुय्यम निबंधक हवेली क्र. ९ यांच्या कार्यालयात दस्त क्र. २५१६/२०१२ ने दिनांक २०/०३/२०१३ रोजी नोंदविण्यात आले.

अशी ही सदर मिळक्त ही लिहुन देणार यांचे स्वकष्टार्जीत कायदेशीर मालकी वहीवाटीची असल्याने त्यांना सदर मिळक्तीचा योग्य त्या प्रकारे विल्हेवाट लावण्याचा अधीकार आहे. तरी आता सदर लिहुन देणार यांना योग्य कारणासाठी आर्थीक रक्कमेची जरुरी, आवश्यक्ता असल्याने ती त्यांनी विक्रीस काढली. लिहुन घेणार हे मिळक्तीच्या शोधात असल्याने त्यांना सदर मिळक्तीच्या विक्रिची माहीती मिळाली त्यानुसार लिहुन घेणार व लिहुन देणार यांचे मध्ये चर्चा व वाटाघाटी होवुन सदर मिळक्त ची एकुण किंमत रक्कम रुपये १८,००,०००/– (अक्षरी अठरा लाख रुपये फक्त) इतकी रक्कम इतर खरेदीदारांनी देवु केलेल्या रक्कमे पेक्षा जास्त असल्याने या रक्कमेस कायम खूष खरेदी देण्याचे ठरले आहे. त्यासाठी सदरचा दस्त करण्यात येत आहे तो पुढील प्रमाणे.

**सदर डीड ऑफ असाईनमेंटच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे :–**

१. सदर फ्लॅट मिळक्त ही पुर्णपणे निर्वेध निजोखमी असुन कोणत्याही कोर्टात न्यायालयात वादाचा विषय नसुन त्यावर सरकारी अथवा खाजगी कर्जबोजा नाही. आजतगायत सदर मिळक्तीस शासनाकडुन ॲक्वीझीशन, रिक्वीझीशन व रिझरर्व्हेशन, करणेबाबत नोटीस आलेली नाही. सदर मिळक्त कोठेही गहाण, दान, बक्षीस, लीन, लिज, साठेखत किंवा अन्यप्रकारचे दस्त ऐवजाने हस्तांतरीत केलेले नाही. सबब मिळक्तीबाबत लिहुन देणार किंवा त्यांचे वालीवारसांनी लिहुन घेणार यांचे व्यतिरीक्त अन्य दुसरे कोणाशी तोंडी अथवा लेखी करार व्यवहार केलेला नाही. सदरील मिळक्त ही संपुर्णपणे निर्वेध व निजोखमी असलेबाबतची लिहुन घेणार यांस खात्री करुन दिलेली आहे. तसेच सदर मिळक्त ही कुठल्याही कोर्ट दरबारीचा विषय नाही. तसेच सावकारी कर्ज, बॅंक, वित्तीय संस्था यांचा बोजा, पोटगी चोळी, बांगडी, तोंडी किंवा लेखी करार केला नाही.

यदाकदाचीत सदर मिळकतीवर मागील काही बोजा आढळुन आल्यास त्याचे सर्वोतोपरी निवारण लिहुन देणार स्वखर्चाने करुन देतील त्याबाबत तक्रार, हरकत घेणार करणार नाही व त्याबाबत लिहुन घेणार यांना तोषीस लागुन देणार नाही.

२. अशा या सदर फ्लॅट मिळकतीचा वर उल्लेख केल्या प्रमाणे सदर लिहुन देणार, लिहुन घेणार यांचे मध्ये चर्चा होऊन एकुण मोबदला रक्कम रुपये १८,००,०००/– (अक्षरी अठरा लाख रुपये फक्त) या रक्कमेस कायम खूष खरेदी घेण्याचे ठरले आहे.

**३. भरणा तपशील :**

| | |
|---|---|
| | |
| | |
| | |
| | |
| | |

४. येणे प्रमाणे सदर मिळकतीची ठरलेली संपुर्ण मोबदला किंमत रक्कम रु. १८,००,०००/– (अक्षरी अठरा लाख रुपये फक्त) सदर लिहुन घेणार यांनी लिहुन देणार यांना दिलेली असुन सदर मोबदला रक्कमे बाबत लिहुन देणार यांची काही एक तक्रार नसुन, वेगळया भरणा पावतीची आवशकता नाही. सदरील व्यवहार परत बोलीचा नाही.

५. सदर मिळकतीचा प्रत्यक्ष व खुला ताबा व कब्जा लिहुन देणार व लिहुन घेणार यांना सदर मिळकतीच्या प्रत्यक्ष जागेवर जाऊन खालील साक्षीदारासमक्ष लिहुन देणार यांनी लिहुन घेणार यांना आज रोजी दिला असुन तो त्यांनी स्विकाराला त्याबाबत लिहुन घेणार यांची काही एक तक्रार नाही.

६. आता सदर फ्लॅट मिळकतीवर लिहुन देणार अगर त्यांचे वालीवारसांचा कोणत्याही प्रकाराचा हक्क व हितसंबंध ताबा वहीवावाट राहीलेला नाही. तरी आता सदर फ्लॅट मिळकत ही पुर्णपणे लिहुन घेणार यांचा मालकीची व हक्काची झालेले आहे. तरी लिहुन घेणार मालकी हक्काने पुत्रपौत्रादी वंशपरंपरेने वहिवाट करतील त्यास कोणी हिल्ला हरकत केल्यास त्याचे सर्वतोपरी निवारण लिहुन देणार स्वखर्चाने करुन देतील त्याबाबत तक्रार हरकत करणार नाही अगर लिहुन घेणार यांस तोशिष

लागु देणार नाही. तसेच लिहुन देणार यांच्या कडे कोणत्याही प्रकारचा हक्क राखुन ठेवलेला नाही. तसेच सदर मिळक्तीचा व्यवहार, सदरचा दस्त लिहुन देणार व लिहुन घेणार यांचे वालीवारसांवर बंधनकारक आहे व राहील.

७. सदर मिळक्त व त्याबत लिहुन देणार यांना प्राप्त असलेले सर्व मालकी हक्क व अधिकार लिहुन देणार यांनी लिहुन घेणार यांचे कडुन सदर मिळक्तीबाबतचा खरेदीचा संपुर्ण मोबदला स्विकारुन सदरच्या दस्ताव्दारे लिहुन घेणार यांना विक्रीचा केला असुन उलट खरेदीचा करार अगर ती परत घेण्याची बोली नाही. सदर मिळक्तीबाबत लिहुन देणार यांना प्राप्त असलेले सर्व मालकी हक्क व अधिकारांचे आता लिहुन घेणार पुर्ण मालक झाले असुन त्यांचेवर लिहुन देणार अगर लिहुन देणार यांचे वालीवारस, सावसावकार, हक्कदार वगैरे कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हितदावा हक्कसंबध मालकी राहीलेली नाही तरी सदर मिळक्तीबाबत लिहुन देणार यांना प्राप्त झालेले सर्व मालकी हक्क व अधिकारांचा उपभोग लिहुन घेणार यांनी पुत्रपौत्रादी, वंशपरंपरा निरंतर मालकी हक्काने घेत जावुन तिची मनमानेल त्याप्रमाणे व्यवस्था अगर विल्हेवाट करावी.

८. तरी येथुन पुढे सदर दस्ता नंतर लिहुन घेणार यांचे नावाची नोंद सदर फ्लॅट मिळक्तीचे एम. एस ई. डीर्स्टीबुशन कंपनी लि., महानगर पालीकेचे कर सोसायटी, पॉपर्टी कार्ड, सात बारा उतारा, अपार्टमेंट, कंडोमिनिअम इत्यादी ठिकाणी नाव लावने साठी लिहुन देणार विना शर्त विना हरक्त, विना सबब, विनातक्रार इतर जादा मोबदला न घेता सही देतील.

९. सदर फ्लॅट मिळक्तीचा आज पर्यंतचा महानगर पलीकेचा कर म्हणजेच घरपटट्ी, पाणीपटट्ी व इतर कर आणि लाईट बील व इतर देणी ही लिहुन देणार यांनी आजपर्यंतची दयावयाची आहेत. येथुन पुढे सर्व कर व इतर देणी ही लिहुन घेणार मालकी हक्काने यांनी भरावयचा आहे.

१०. विकसक /बिल्डर कडुन ना हरक्त प्रमाणपत्र मिळवुन संपुर्ण जबाबदारी ही लिहुन देणार यांची राहील व त्यासाठी येणारा संपुर्ण खर्च हा लिहुन देणार यांनी करावयाचा आहे.

११. सदर इमारतीची अदयाप सहकारी गृह रचना संस्था / अपार्टमेंट कंडोमिनीअम / स्थापन झाली नसुन भविष्यात स्थापन झाल्यानंतर सदर लिहुन घेणार यांना सदर संस्थेचे सभासदस्यत्व देण्यास लिहुन देणार यांची काही एक हरक्त नसुन पुर्ण संमती आहे.

१२. सदर मिळकताचे संपुर्ण कागदपत्रे म्हणजेच करारनामा, बांधकाम परवाना, ताबा पावती, लाईट बिल, कर पावती, गुंठेवारी दाखला, ब्लु प्रिंट, ना हरकत प्रमाणपत्र इत्यादी कागदपत्रे ही लिहुन देणार यांनी लिहुन घेणार यांना दिलेली आहेत त्याबाबत लिहुन घेणार यांची काही एक तक्रार नाही.

१३. सदरची मिळकत ही स्वतःचे नावावर करण्यासाठी येणारा संपुर्ण खर्च म्हणजेच मुद्रांक शुल्क, नोंदणी फी, वकील फी, व इतर खर्च हा लिहुन घेणार यांनी स्वखर्चाने करावयाचा आहे किंवा केलेला आहे.

१४. सदर दस्तामध्ये किंवा मिळकतीच्या वर्णनामध्ये काही चुक झाल्यास सदर कामी चुक दुरुस्त दस्त करण्याची आवशकता भासल्यास लिहुन देणार हे लिहुन घेणार यांना सर्वोतोपरी सहकार्य हे विनामोबदला करतील.

१५. सदरचा दस्त हा मालमत्ता हस्तांतरणकायदा, भारतीय नोंदणी कायदा १९८२, महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० व महाराष्ट्र फ्लॅट ओनरशीप कायदा, आणि महाराष्ट्र मुद्रांक शुल्क कायदयातील तरतुदी प्रमाणे करण्यात आलेला आहे त्यानुसार सदर मिळकतीचे संपुर्ण अधिकार हे लिहुन घेणार यांना प्राप्त झाले असुन लिहुन देणार यांचा सदर मिळकतीशी काही एक संबध राहीलेला नाही.

## परिशिष्ठ 'अ' जमीन मिळकत

**मिळकतीचे वर्णन :** तुकडी पुणे पोट तुकडी तालुका : हवेली, जिल्हा : पुणे सह दुय्यम निबंधक हवेली पुणे यांचे कार्यक्षेत्रातील व पुणे महानगर पालीकेच्या हददीतील गाव मौजेः आंबेगाव बु, तालुकाः हवेली, जिल्हाः पुणे, येथील स. नं. १६, हिस्सा नं. ९/२ येथील यांसी क्षेत्र ०० हे २५ आर पैकी क्षेत्र ०० हे ०२ आर (२०० चौ. मी.) यांसी चतु:सीमा खालील प्रमाणे :–

पुर्वेस :– स. नं. १६, हिस्सा नं. ८ पैकी चोरघे यांची मिळकत
दक्षिणेस :– लक्ष्मी अर्पाटमेंट ए विंग बिल्डींग
पश्चिमेस :– रस्ता
उत्तरमेस :– श्री. जगताप यांची मिळकत

## परिशिष्ठ 'ब' फ्लॅट मिळकत

**मिळकतीचे वर्णनः** तुकडी पुणे पोट तुकडी तालुकाः हवेली, जिल्हाः पुणे सह दुय्यम निबंधक हवेली पुणे यांचे कार्यक्षेत्रातील व पुणे महानगर पालीकेच्या हददीतील गाव मौजेः आंबेगाव बु, तालुकाः हवेली, जिल्हाः पुणे,

येथील स. नं. १६, हिस्सा नं. ९/२  येथील यांसी क्षेत्र ०० हे २५ आर पैकी क्षेत्र ०० हे ०२ आर (२०० चौ. मी.) या जमीन मिळकतीवर बांधण्यात आलेल्या लक्ष्मी अपार्टमेंट बी विंग मधील दुसऱ्या मजल्यावरील फ्लॅट नं. २०३ यांसी क्षेत्र ५३५ चौ. फुट म्हणजेच ४९.७२ चौ. मी. बिल्ट अप असे. (बाल्कनीच्या क्षेत्रासह इमारतीमधील जीना, पॅसेज, लॉबी, लॅडींग्ज व इतर सामुदायीक क्षेत्रामधील फ्लॅट क्षेत्राच्या प्रमाणात अविभक्त हिश्शाच्या क्षेत्रा सह)

येणेप्रमाणे सदरच्या डीड ऑफ असाईनमेंट दस्तावर लिहुन घेणार व लिहुन देणार यांनी राजीखुषीने व अक्कल हुशारीने वाचुन, समजावुन घेवुन, विना खानपान करता कोणाच्याही दबावास न येता स्वेइच्छेने पुणे मुक्कामी खालील साक्षीदारांसमक्ष सह्या केल्या आहेत. लिहुन घेणार हे आता सदर मिळकतीचे संपुर्णपणे मालक झाले आहेत.

| सही | अंगठा | फोटो |
|---|---|---|
| **श्री. संदीप दत्तात्रय धोत्रे**<br>लिहुन घेणार | | |
| **सौ. सुशीला संदीप धोत्रे**<br>लिहुन घेणार | | |
| **श्री. मुरलीधर चत्रभुज दिवाणे**<br>लिहुन देणार | | |

**साक्षीदार**

| | |
|---|---|
| सही<br>नाव<br>पत्ता : | सही<br>नाव<br>पत्ता : |